# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०१ १०१

**नगरसचिव विभाग**

जा.क्र.मनपा/सचिव/९२८/२०२१-२२ दिनांक :- ३० /११ /२०२१

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०१/१२/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता प्रत्यक्ष सहभागाने आयोजित करण्यात आली आहे. परंतु, सद्स्थितीत जगभरात ओमीक्रॉन कोविड -19 संसर्गाच्या नविन व्हेरीयंटचे रुग्ण सापडत असून, त्या अनुषंगाने भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने कोविड - 19 संदर्भात दक्षता घेण्याचे दृष्टीने नव्याने नियमावली जाहिर केलेली आहे. या सर्व बार्बीचा विचार करुन, मा. महापौर, मा. आयुक्त व सर्व पदाधिकारी यांचे समवेत आयोजित बैठकीमध्ये प्रत्यक्ष सहभागाने आयोजित करण्यात आलेली मा. महासभा Video Conferencing द्वारे आयोजित करण्याचे निश्चीत केले आहे.

त्या अनुषंगाने बुधवार दि. ०१/१२/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली मा. महासभा, त्याच दिवशी दुपारी ठिक १२.०० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आली आहे. तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

**मा. महापौर यांचे मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

टिप :- सन्मा. पालिका सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, Online महासभेला Join होण्यासाठी खालील काही सुचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र. | सुचना |
|---|---|
| 1. | आपणांस ईमेलद्वारे किंवा मोबाईलवर Video Conferencing ची Link पाठविण्यात येईल. |
| 2. | सदर Link ओपन केल्यावर येणारे Zoom Mobile App Download डाऊनलोड करुन Video Conference बैठकीत १५ मिनीटे अगोदर सहभाग घ्यावा. |
| 3. | डाव्या बाजुला खाली Mic च्या Symbol वर Click केल्यावर Call Over Internet चे बटन दाबावे. |
| 4. | सन्मा. पालिका सदस्यांनी सभा Join करताना आपले पूर्ण नाव व प्रभाग क्रमांक टाकून लॉगीन करावी. |
| 5. | सभा सुरु होण्याची वेळ दुपारी १२.०० ची जरी असली तरी सभेस Join होण्याची वेळ सकाळी ११.४५ ची आहे. |
| 6. | सन्मा. सदस्यांना सभेत बोलावयाचे असेल तेव्हा More मधील Raise Hand बटनावर Click करावे. यामुळे मा. महापौर यांना समजेल की, आपणास बोलायचे आहे. किंवा आपला हात वर करावा. तसेच मा. महापौर यांचे परवानगीने बोलावे. |
| 7. | कृपया सभेला Join होण्यासाठी हेडफोनचा वापर करावा. |
| 8. | सन्मा. पालिका सदस्यांना पाठविण्यात आलेली Link अन्य कोणत्याही व्यक्तीस Share करु नये. |
| 9. | Logout झाल्यास सभेमध्ये पुन्हा सहभागी होण्यासाठी User id आणि Password चा वापर करावा. |
| 10. | काहीही तांत्रिक अडचण भासल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.<br>1) श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर - 8422811399 |